भक्तिमय वातावरणात जोतिबाचा पहिला खेटा

पहाटेपासूनच श्री जोतिबाच्या दर्शनासाठी भाविकांनी अलोट गर्दी

जोतिबा डोंगर : पुढारी वृत्तसेवा

दख्खनचा राजा श्री जोतिबाच्या खेट्यांना रविवारी उत्साहात सुरुवात झाली. पहिला खेटा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. पहाटेपासूनच श्री जोतिबाच्या दर्शनासाठी भाविकांनी अलोट गर्दी केली होती. 'चांगभलं'च्या गजराने संपूर्ण मंदिर परिसर आणि डोंगर दुमदुमून गेला.

रविवारी पहाटे चार वाजता मंदिराचे दरवाजे उघडले. त्यानंतर श्री जोतिबाची पाद्यपूजा व काकड आरती सोहळा संपन्न झाला. सकाळी आठ वाजता जोतिबासह सर्व देवदेवतांना अभिषेक घालण्यात आला. यानंतर श्री जोतिबाची खडी अलंकारिक महापूजा बांधण्यात आली. सकाळी साडेअकरा वाजता श्रींचा धुपारती सोहळा उंट, घोडे, मानकऱ्यांसह संपन्न झाला. दिवसभरात असंख्य भाविकांनी कुलदैवत दख्खनचा राजाचे दर्शन घेतले. पहाटेपासूनच भाविकांची डांगरावर मांदियाळी असल्याने पार्किंग वाहनांनी फुल्ल भरून गेले होते. सायंकाळी उंट, घोड्याचा लवाजम्यासह आणि गुलाल खोबऱ्याची उधळण करत श्रींचा पालखी सोहळा संपन्न झाला. दिवसभरात कोडोली पोलिसांनी कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

दख्खनच्या राजा श्री जोतिबाची बांधण्यात आलेली खडी अलंकारिक पूजा.

विधानसभा सभापती राहुल नार्वेकर यांनी घेतले दर्शन

महाराष्ट्र विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर यांनी कुलदैवत जोतिबाचे दर्शन घेतले. यावेळी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती व भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सदस्य हेमंत भोरे यांनी त्यांचे स्वागत केले. तर पुजारी उत्कर्ष समितीतर्फे त्यांना श्रींचा फोटो देऊन सत्कार केला. यावेळी प्राधिकरणसंदर्भातील विषयात ग्रामस्थांना विचारात घेऊनच विकास केला

जोतिबा डोंगर : पहिल्या खेट्यासाठी रविवारी भाविकांनी केलेली गर्दी.

कुंभमेळ्यासाठी जाणाऱ्या भाविकांच्या बसला अपघात

मंगळवेढा : बेळगावहून प्रयागराज कुंभमेळ्यासाठी दर्शनाला जाणाऱ्या मिनी बसचा कोल्हापूर-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर ट्रॅव्हलर गाडीचे (केए २४-७१७६) मागील टायर फुटून रविवारी सकाळी साडेआठ वाजता माचणूर (ता. मंगळवेढा) येथे भीषण अपघात झाला. यात एकूण १३ प्रवासी प्रवास करत होते. त्यापैकी चारजण गंभीर जखमी झाले आहेत.

A BRAND OF RAJNISH WELLNESS LIMITED

जोश, ताकद, ENERGY आणि स्फूर्ती वाढवते!!!

महिलांसाठी सुद्धा उपलब्ध प्ले-विन-F कॅप्सूल फक्त महिलांसाठी

प्ले-विन कॅप्सूल फक्त पुरुषांसाठी

पुरुषांमध्ये आलेली शारीरिक कमतरता आणि उत्साहची कमी, तणाव हया सारख्या समस्यांना दूर करण्यासाठी तसेच शक्ति, उत्साह वाढविण्यासाठी प्ले-विन कॅप्सूल चा २१ दिवसापर्यंत सकाळी व संध्याकाळी नियमित सेवन करा. जास्त आणि चांगल्या परिणामांसाठी प्ले-विन तेलाच्या काही थेंबांनी कमकुवत नसांना मालिश करा आणि शिथिल अंगाला मजबूत, सुदृढ व कठोर बनवा.

प्ले-विन कॅप्सूलचा २१ दिवसापर्यंत १ सकाळी व १ संध्याकाळी नियमित सेवन करा.

चांगल्या परिणामांसाठी प्ले-विन तेलाचाही वापर करा.

तेल कॅप्सूल

सर्व मेडिकल/आयुर्वेदिक स्टोअर्स मध्ये उपलब्ध

पहिल्या दिवसापासून परिणाम सुरु*

महत्त्वाचे

सोलापूरला आज उजनीतून पाणी सोडणार

सोलापूर : जिल्हास्तरीय आकस्मिक पाणी आरक्षण समितीमध्ये झालेल्या निर्णयानुसार उजनी धरणातून सोमवारी सकाळी नऊ वाजता सोलापूरला पिण्यासाठी पाणी सोडण्यात येणार आहे. सोलापूरबरोबरच पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा नगरपरिषद व नदीकाठच्या ग्रामपंचायतीच्या पिण्याच्या पाण्याची सोय होणार आहे. यंदा जिल्ह्यात चांगला पाऊस झाल्याने उजनी धरण १०० टक्के भरले होते. पावसाचा जोर सुरूच असल्यामुळे जवळपास १०० टीएमसीपेक्षा जास्त पाणी पावसाळ्यात नदीपात्रातून सोडून देण्यात आले. उजनी धरण १०० टक्के भरल्यानंतर त्यावर अवलंबून असलेल्या शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार सोलापूर शहरासह इतर तीन नगरपरिषदा व नदीकाठच्या ग्रामपंचायतींना पिण्यासाठी पाणी सोडण्यात येणार आहे.

शिवथर व वडूथमधील एटीएम फोडले : सोळा लाखांची रक्कम लंपास

शिवथर : शिवथर व वडूथ (जि. सातारा) येथे चोरट्यांनी एकाच रात्रीत स्टेट बँक ऑफ इंडिया व बँक ऑफ इंडिया या दोन बँकांची एटीएम फोडली. त्यामधून १६ लाखाची रक्कम लंपास केली. शिवथर येथील सातारा - लोणंद रस्त्यालगत स्टेट बँकेचे एटीएम आहे. या ठिकाणी शनिवारी रात्री दोनच्या दरम्यान चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यावर स्प्रे मारून ही यंत्रणा निकामी केली. त्यानंतर गॅस कटरच्या साह्याने एटीएम फोडले. त्यातून अंदाजे ६ लाख ११ हजार रुपये चोरून नेले. हा प्रकार पाच मिनिटात घडला. ही घटना शिवथर ग्रामपंचायतीने बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली आहे. एटीएम फोडून चोरट्यांनी लोणंदच्या दिशेने पलायन केले असल्याचेही कॅमेऱ्यात दिसत आहे. दुसऱ्या घटनेत येथून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावरील वडूथ येथीलही बँक ऑफ इंडियाचे एटीएम चोरट्यांनी गॅस कटरच्या साह्याने फोडले. त्यामधून अंदाजे ११ लाख ३१ हजार ५०० रुपये चोरून नेले असल्याची नोंद पोलिस स्टेशनला झाली आहे.

फडणवीस सरकार एकही योजना बंद करणार नाही : चंद्रशेखर बावनकुळे

कोल्हापूर : फडणवीस सरकार एकही योजना बंद करणार नाही. लाडकी बहीण योजनेतील कोणावरही कारवाई करणार नाही, कोणाचेही पैसे परत घेणार नाही. मात्र योजनेच्या व्याख्येत बसणार नाहीत, त्यांना लाडक्या बहिणीचा लाभ मिळणार नाही, अशी माहिती भाजप प्रदेशाध्यक्ष महसूलमंत्री चंद्रकशेखर बावनकुळे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्रात मुख्यमंत्रिपदाचे काँग्रेसने आठ, शरद पवार राष्ट्रवादीने तीन फलक लावले होते. उद्धव ठाकरेही मुख्यमंत्रिपदाचे दावेदार होते. मात्र महायुतीला जनतेने साथ दिली. महाराष्ट्रात भाजप महायुतीस तीन कोटी १७ लाख मते दिली; तर महाविकास आघाडीस २ कोटी १७ लाख मते दिली. एक कोटी मते भाजप महायुतीला जादा दिली. हा जनतेचा विश्वास आहे. आ. सुरेश धस प्रामाणिक कार्यकर्ते आहेत. संतोष देशमुख प्रकरणातील आरोपींना शिक्षा झाली पाहिजे अशी आ. धस आणि आणि मंत्री धनंजय मुंडे यांची भूमिका आहे.

कुंडलमध्ये निर्यातक्षम द्राक्ष बागेला भीषण आग; लाखो रुपयांचे नुकसान

पलूस : तालुक्यातील कुंडल येथे शरद कृष्णा या उच्च प्रतीच्या जातीच्या द्राक्ष बागेला अचानक आग लागली. या दुर्घटनेत लाखोंच्या द्राक्ष उत्पादनाचे नुकसान झाले आहे. घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, किर्लोस्करवाडी रस्त्यावर भीमराव बापूसाहेब लाड यांची शरद कृष्णा जातीची दोन एकर द्राक्षबाग आहे. द्राक्ष बागेत टाकण्यासाठी त्यांनी बागेशेजारी उसाच्या पाल्याचा कुट्टा ठेवला होता. रविवारी सकाळी लाड यांच्या घराशेजारी द्राक्षबागेत टाकण्यासाठी आणलेल्या उसाच्या पाल्याच्या कुट्ट्यामधून धूर यायला सुरुवात झाली. यावेळी कुट्ट्याला आग लागल्याचे शेजारील व रस्त्यावरील लोकांना लक्षात आले. त्यांनी तत्काळ द्राक्ष बागायतदार लाड यांना फोनवरून कळविले. स्थानिक शेतकरी आणि अग्निशमन दलाच्या मदतीने आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले.

युवक काँग्रेसचे पुण्यात हल्लाबोल आंदोलन

पुणे : वाढती बेरोजगारी आणि ड्रग्ज तस्करी विरोधात युवक काँग्रेसच्या वतीने रविवारी हल्लाबोल आंदोलन करण्यात आले होते. 'नोकरी द्या, नशा नको' अशा घोषणा देत कार्यकर्ते काँग्रेस भवन येथून डेक्कनकडे निघाले. मात्र, झाशीची राणी चौक येथे पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना अडविले. यावेळी आंदोलनकर्ते चांगलेच आक्रमक झाले होते. बॅरिकेडिंगवरून पुढे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या युवक काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना पकडून पोलिसांनी ताब्यात घेतले. आंदोलनकर्त्यांनी घोषणाबाजी करीत परिसर दणाणून सोडला.

सक्रिय सदस्य नोंदणी यशस्वी करा, निवडणुका जिंका

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा भाजप संघटनपर्व कार्यशाळेत कार्यकर्त्यांना कानमंत्र

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

देशात आणि राज्यात नेत्यांच्या निवडणुका पार पडल्या आहेत. नेत्यांच्या निवडणुकांत कार्यकर्त्यांनी झपाट्याने काम केल्याने जिंकल्या आहेत. आता कार्यकर्त्यांना बळ देण्याची वेळ आली आहे. यापुढे नेत्यांच्या नव्हे तर कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका आहेत. त्यामुळे सक्रिय सदस्य नोंदणी यशस्वी करा आणि निवडणुका जिंका, असा कानमंत्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी कार्यकर्त्यांना दिला. राज्यात सक्रिय सभासद नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण केल्यास भाजप पंधरा वर्षे सत्तेत राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

भारतीय जनता पक्षातर्फे महासैनिक दरबार येथे आयोजित संघटन पर्व कार्यशाळेत ते बोलत होते. बावनकुळे म्हणाले, कार्यकर्त्यांच्या निवडणुकांसाठी पक्ष नेतृत्व आणि नेते कमी पडणार नाहीत. 'घर चलो अभियाना'तून उद्दिष्ट पूर्ण केले पाहिजे. नेत्यांनी पदाधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे सदस्य नोंदणी केल्यास पाच वर्षे त्यांना कोणीही हरवू शकणार नाही. लोकसभेच्या १८ जागा अत्यंत कमी मतांनी गमावल्या आहेत. महायुतीने विधानसभेच्या २८८ पैकी १३७ जागा जिंकल्या हे कार्यकर्त्यांचे यश आहे. संघटन मजबूत झाल्यास १३ हजार कार्यकर्त्यांना विविध निवडणुकांत संधी मिळेल. आगामी जि. प. पंचायत समिती अध्यक्ष, महापौर, नगरसेवक, ग्रामपंचायत सदस्य भाजपचेच असतील. पार्लमेंट टू पंचायत सर्वच स्तरावर भाजप सत्तेत राहणार आहे. सक्रिय सदस्य असल्याशिवाय पक्षात पद आणि निवडणुकीत एबी फॉर्म मिळणार नाही. २०२४ मध्ये फडणवीस मुख्यमंत्री होतील, असा दावा २०२२ मध्ये केला होता. तेव्हा अनेकांनी टर उडविली.

महायुतीची ६९ लाख मते वाढली, महाविकासची ३३ लाख मते कमी

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीची ३३ लाख मते कमी झाली. भाजप महायुतीची ६९ लाख मते वाढली. हे कार्यकर्त्यांचे यश असल्याचे बावनकुळे म्हणाले.

बालेकिल्ल्यातच काँग्रेसच्या ठिकऱ्या उडवल्या : पाटील

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, काँग्रेसचा बालेकिल्ला असणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेसची धूळधाण केली, ठिकऱ्या उडविल्या. विधानसभेच्या २६ जागांपैकी २० जागा महायुतीने जिंकल्या. त्यामध्ये भाजप १३, राष्ट्रवादी अजित पवार गट ७ जागा आहेत. पूर्वीच्या पालकमंत्र्यांनी भांडे स्वच्छ करून ठेवले आहे. राज्यातील अनेक नेते भाजपमध्ये येण्यास इच्छुक आहेत. कोणी किती जादूटोणा केला तरी काही फरक पडणार नाही. धनंजय महाडिक यांनी यादी दिली आहे. लवकरच या सर्वांचा भाजपमध्ये प्रवेश होईल.

कार्यध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले, प्रत्येकास राजकीय महत्त्वाकांक्षा असते. पदाकडे जाण्याचा मार्ग संघटन पर्वातून जातो. समाजाचा प्रत्येक घटक भाजपशी जोडावा. प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील म्हणाले, एक कोटी १६ लाख नोंदणी पूर्ण असून ३४ लाख नोंदणी आवश्यक आहे.

खंडपीठासाठी दसरा चौकात बेमुदत उपोषण सुरू

कोल्हापूर : मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापुरात व्हावे या मागणीसाठी पदवीधर मित्रचे माणिक पाटील चुयेकर यांनी रविवारपासून दसरा चौकात उपोषण सुरू केले आहे.

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापुरात व्हावे या मागणीसाठी खंडपीठ कृती समितीच्या सहकार्याने, पदवीधर मित्रचे माणिक पाटील-चुयेकर यांनी रविवारपासून दसरा चौकात बेमुदत उपोषणाला सुरुवात केली. पहिल्याच दिवशी उपोषणाला विविध स्तरातून पाठिंबा देण्यात आला.

कोल्हापूर जिल्हा बार असो.चे अध्यक्ष तथा खंडपीठ कृती समितीचे निमंत्रक ॲड. सर्जेराव खोत म्हणाले, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापुरात व्हावे या मागणीसाठी दीर्घकालीन लढा सुरू आहे. अन्य शहरानेही केलेल्या मागण्या अमान्य करण्यात आल्या आहेत. मात्र कोल्हापूरची मागणी न्याय आणि रास्त असल्याने त्याबाबत सरकार सकारात्मक आहे. पण अजूनही निर्णय होत नाही. सरकारने विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून खंडपीठाबाबतचा निर्णय त्वरित घ्यावा.

ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. महादेवराव आडगुळे म्हणाले, खंडपीठासाठी सुरू असलेले आंदोलन आता अंतिम टप्प्यात आले आहे. सर्वांनीच त्यात सहभागी होऊन अंतिम निर्णय होईपर्यंत ते अधिक नेटाने पुढे नेले पाहिजे.

पोलिसांना चकवण्यासाठी साधू वेशात राहणाऱ्यास अटक

भोपाळ : वृत्तसंस्था

मध्य प्रदेशच्या भोपाळ पोलिसांनी एका मुलीच्या आत्महत्येप्रकरणी हवा असलेला आरोपी चित्रपटात एखादी घटना घडावी त्या पद्धतीने कुंभमेळ्यातून पकडला. विशेष म्हणजे हा आरोपी साधूचा वेश घालून कुंभमेळ्यात फिरत होता.

मध्य प्रदेशातील सुखिसेवनिया पोलिस ठाण्याच्या अंतर्गत येत असलेल्या एका गावात एका अल्पवयीन मुलीने आत्महत्या केली होती. त्याचा तपास केला असता निलेशकुमार दुबे हा युवक या आत्महत्येसाठी कारणीभूत असल्याचे समोर आले होते. त्याच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.

कर्मचारी नेमणे आहे

बहुराज्य कार्यक्षेत्र असणाऱ्या ''**शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्या.**'' या संस्थेमध्ये मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगड विभागाकरिता **लिपीक कर्मचारी** नेमणे आहे.

कर्मचारी पदाकरीता – पदवीधर आवश्यक, संगणक ज्ञान आवश्यक, अनुभव असल्यास प्रथम प्राधान्य.

तरी इच्छुकांनी आपले अर्ज खालील पत्त्यावर **दि. ०१/०३/२०२५** पर्यंत पोहोचतील असे पाठवावे किंवा खालील ई-मेलवर मेल करावेत.

Email : hr@shivsahyadri.co

मुख्य कार्यालय :- ११८, देवी भवन, ५ वा मजला, सेनापती बापट मार्ग, माटुंगा रोड (प.), मुंबई-४०० ०१६

जाहीर सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, श्रीमती मंजुला रमणिकलाल राजपारा - अनुसूची १ मध्ये निर्देशित मालमत्तेसंदर्भात मुलगा श्री. पंकज रमणिकलाल राजपारा यांच्यासमवेत संयुक्त मालक व ५०% पूर्णतः प्रदानित शेअरधारक आहेत.

श्री. रमणिकलाल राजपारा (श्रीमती मंजुला रमणिकलाल राजपारा यांचे पती) यांचे दि. १२.१२.१९८८ रोजी गुजरातमध्ये निधन झाले.

श्रीमती मंजुला रमणिकलाल राजपारा यांचे दि. ११.०८.२०१४ रोजी मुंबईत निधन झाले, त्यांच्या मागे त्यांची तीन मुले नावे - १. श्री. भरत रमणिकलाल राजपारा, २. श्री. पंकज रमणिकलाल राजपारा, ३. श्री. विजय रमणिकलाल राजपारा व एक मुलगी - श्रीमती रेखा बन्सीलाल ढोलकिया पूर्वाश्रमीच्या रेखा रमणिकलाल राजपारा हे वारसा कायद्यान्वये त्यांचे वारस व कायदेशीर प्रतिनिधी आहेत, ज्यांनी त्यांच्या मृत्यूच्या वेळी त्यांचा सांभाळ केला होता.

अनुसूची १

फ्लॅट क्र.४०३, ४ था मजला, मोजमापित ४६.०० चौ. मी. चटई क्षेत्रफळ अर्थात ५५.२ चौ. मी. बिल्ट अप क्षेत्र, इमारतीचे नाव श्री राजश्री विहार को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., पत्ता चित्तरंजन नगर, डी कॉलनी, राजावाडी, विद्याविहार (पूर्व), मुंबई -४०० ०७७, सर्व्हे क्र. ९८ (पार्ट), सीटीएस क्र.४६८ - बी धारक जमिनीवर निर्मित, गाव किरोल, तालुका कुर्ला, मुंबई उपनगर जिल्हा येथील.

अशा प्रकारे, कोणाही व्यक्तीचा श्रीमती मंजुला रमणिकलाल राजपारा यांचे कायदेशीर वारस असल्याचा दावा असल्यास किंवा वरील निर्देशित मालमत्तेमध्ये कोणताही दावा, हितसंबंध असल्यास त्यांनी कृपया मकवाना ॲन्ड असोसिएट्स यांचे कार्यालय, वकील, मुंबई उच्च न्यायालय, त्यांचा पत्ता : १०८, १ ला मजला, गुंदेचा चेंबर, नगीनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई -४०० ००१ येथे सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांच्याआत सूचित करावे व /वा त्यांची हरकत सादर करावी.

दि.१७.०२.२०२५

मकवाना ॲन्ड असोसिएट्स

१०८, १ ला मजला, गुंदेचा चेंबर,
नगीनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई -४०० ००१.
मोबाइल नं. : ९९३०३२५५५५
ई-मेल : makwanaandassociatess@gmail.com

सेंट्रल बँक ऑफ इंडिया
सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India

उत्तर मुंबई क्षेत्रीय कार्यालय
३रा मजला ,एनसीएल बिल्डिंग, प्लॉट नं.६, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पूर्व, मुंबई - ४०००५१.
Email : rmmsro@centralbankofindia.co.in

भाडे तत्त्वावरील जागेसाठी बोली / प्रस्तावांचे आमंत्रण

सेंट्रल बँक ऑफ इंडियाला भाडे तत्वावर गोरेगांव पश्चिम येथे सुंदरनगर आणि पिरामल नगरच्या आसपासचा परिसर, एसव्ही रोड, महिंद्रा गार्डन जवळ. गोरेगाव पश्चिम-४००१०४ येथे १८०० ते २००० चौरस फूट चटई क्षेत्र असलेली जागा १ महिन्याच्या आत/व्यावसायासाठी शक्यतो तळ मजल्या वर तयार असणे आवश्यक आहे. पुरेशा पार्किंगसह लगतच एटीएमसाठी जागा गोरेगांव पश्चिम शाखा स्थलांतरासाठी आवश्यक आहे. कृपया कोणतेही दलाल अथवा मध्यस्थ आणू नये. शासकीय/निम शासकीय संस्था किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल. कृपया **https://www.centralbankofindia.co.in** वेबसाइट किंवा सेंट्रल बँक ऑफ इंडिया नॉर्थ मुंबई रिजनल ऑफिस, तिसरा मजला, एनसीएल बिल्डिंग, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई ४०००५१ येथून फॉरमॅट/अटी आणि शर्ती डाउनलोड करता येतील. **दि. १०.०३.२०२५ (सोमवार) रोजी १७.०० वाजेपर्यन्त "गोरेगाव (पश्चिम) शाखेच्या परिसरासाठी सीलबंद निविदा"** असे लिफाफ्यावर नमूद करून अर्जरुपी लिफाफा तिसरा मजला, **एनसीएल बिल्डिंग, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई-४०००५१ येथे पोहोचला पाहिजे.**

प्रत्येक बोली रु. १०,०००/- प्लस जीएसटी १८% च्या दराने एकूण रु. ११,८००/-(रुपये अकरा हजार आठशे मात्र) बयाणा रकमेचा डिमांड ड्राफ्ट आवश्यक आहे. डिमांड ड्रॉफ्ट सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा नावे असले पाहिजे. कोणतेही कारण न देता कोणत्याही/सर्व ऑफर नाकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे.

स्थळ : मुंबई — प्रादेशिक प्रमुख
दिनांक : १७.०२.२०२५ — दमुंक्षेका

MUTHOOT CAPITAL SERVICES LTD. | GOLD AUCTION NOTICE

Registered Office: 3rd Floor, Muthoot Towers, M.G Road, Kochi, Kerala - 682 035.
P: +91-484-6619600, 6619641, CIN: L67120KL1994PLC007726

मुथूट कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेडच्या वेगवेगळ्या ठिकाणांमधून खालील वाहन कर्जाच्या संदर्भात अतिरिक्त सुरक्षा म्हणून सोन्याचे दागिने जमा केलेल्या सर्व संबंधित माहितीसाठी नोटीस दिली गेली आहे, जिथे संबंधित ग्राहकांनी घेतलेल्या वाहनांचे कर्ज थकीत राहिले, तरीही असूनही, जमा झाले. PALGHAR जिल्ह्यासाठी खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार वारंवार नोटिसाचा लिलाव केला जाईल. निविदाकारांना केवळ दहा हजार रुपये दहा हजार रुपये जमा करण्यासाठी आणि फोटो आयडी कार्ड आणि पॅन कार्ड तयार करण्याची विनंती केली जाते. यशस्वी निविदाकारांना केवळ आरटीजीएस/एनईएफटीद्वारे व्हॉटसह सर्व देयके देण्याची विनंती केली जाते.

PALGHAR - VASAISOPARA लिलाव केंद्र: Muthoot FinCorp Ltd., Ground Floor, Tania Residency, Shop No.3 & 4, Achole Road, Near Dubey Medical College, Nallasopara East, Maharashtra , 401209. **लिलाव तारीख**: 25.02.2025 **लिलाव वेळ**: 10.00 **ए एम- VASAISOPARA**:- TWL1021MH0000062418.

कृपया लक्षात घ्या की कोणत्याही कारणास्तव वर नमूद केलेल्या तारखांवर लिलाव केला गेला नाही तर **PALGHAR** जिल्ह्यासाठी **10.00** तारीख वर **08.03.2025** आयोजित केली जाईल. आमच्या **PALGHAR** शाखेत आहे.

For Muthoot Capital Services Ltd.
Authorised Auctioneer

IDBI BANK

सीआयएन : L65190MH2004GOI148838
कार्यालय : आयडीबीआय टॉवर, ७ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

विक्री सूचना रद्द झाल्याची जाहीर सूचना

श्री. कैलास पवार व श्रीमती मनीषा पवार यांच्या नावे असलेल्या स्थावर मालमत्तेसंदर्भात ''दैनिक बिझनेस स्टॅन्डर्ड'' व ''पुढारी'' वर्तमानपत्रात दि. ०४.०२.२०२५ रोजी प्रकाशित ई-लिलाव विक्री सूचना याद्वारे रद्द करण्यात येत आहे व मागे घेण्यात येत आहे.

दिनांक : १७.०२.२०२५ — प्राधिकृत अधिकारी
ठिकाण : मुंबई — आयडीबीआय बँक लि.

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे

गांवदेवी मंडई ईमारत, पहिला मजला, गोखले रोड, ठाणे (पश्चिम) - ४०१ ६०२
दुरध्वनी - २५३३१४८६ — email-ddr.tna@gmail.com

जा.क्र. जिउनी/ठाणे/बी-१२/निवडणूक/५३०११ सन २०२५
दिनांक - १३/२/२०२५

जाहीर सुचना

(कोकण विभागीय नागरी/पगारदार सहकारी पतसंस्था फेडरेशन लिमिटेड यांचे सभासदांसाठी)

विषय:- कोकण विभागीय नागरी/पगारदार सहकारी पतसंस्था फेडरेशन लिमिटेड ठाणे या संस्थेच्या सन २०२४-२०२५ ते २०२९-२०३० या कालावधीच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीकरिता सभासद संस्थेच्या प्रतिनिधीचा ठराव पाठविणेबाबत.

कोकण विभागीय नागरी/पगारदार सहकारी पतसंस्था फेडरेशन लिमिटेड या संस्थेच्या सभासदांना, कळविण्यात येते कि, उक्त नमूद फेडरेशनच्या सन २०२४-२०२५ ते २०२९-२०३० या कालावधीच्या संचालक मंडळाच्या निवडणुकी करिता मतदान करणे, निवडणुकीस उभे राहणे, सूचक होणे, अनुमोदन देणे या करीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियान १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ व फेडरेशनचे मंजूर उपविधी यांचेनुसार प्रतिनिधीची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्याकरिता ठरावाचा मसुदा, संस्थेचा दाखला यांचे नमुने सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

आपणास कळविण्यात येते कि, आपण आपल्या संस्थेतर्फे प्रतिनिधी नेमणुकीचे ठराव व आपल्या संस्थेकडील दाखला दि. १७.०२.२०२५ ते १८.०३.२०२५ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) आपल्या संस्थेचे मुख्यालय ज्या तालुक्यात असेल तेथील उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयात तीन प्रतीत सादर करावेत. तसेच ठरावासोबत दाखला व संस्थेचे साक्षांकित नोंदणी प्रमाणपत्र जोडावे. या संदर्भात ठराव व दाखला यांचे नमुने व ते सादर करणेबाबतच्या सविस्तर सुचना या कार्यालयात, संबंधीत उप / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, यांचे कार्यालयात व फेडरेशनच्या कार्यालयात पहावयास मिळतील.

शिक्का

सही/-
(डॉ. किशोर मांडे)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी,
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे

गांवदेवी मंडई ईमारत, पहिला मजला, गोखले रोड, ठाणे (पश्चिम) - ४०१ ६०२

मुरबाड तालुका शेतकरी सहकारी संघ लि. तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे
व्यवस्थापक समिती पंचावार्षिक निवडणुक
संस्था सभासदांचे ठराव मागविण्याचा कार्यक्रम
(फक्त संस्थेच्या सभासद संस्थांकरिता)
जाहीर सुचना

मुरबाड तालुका शेतकरी सहकारी संघ लि. तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेच्या व्यवस्थापक समितीच्या निवडणुकीकरिता सभासद संस्थांच्या प्रतिनिधीचे ठराव महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम क्रमांक ९ आणि १० अन्वये दिनांक १७/०२/२०२५ ते १७/०३/२०२५ या कालावधीत मागविण्यात येत आहेत. सभासद संस्थांची प्राथमिक मतदार यादी ही दिनांक ०१/०१/२०२५ या अर्हता दिनांकावर निश्चित करावयाची आहे. सभासद संस्थांनी प्रतिनिधीचे ठराव पाठविताना खालील प्रमाणे काळजी घेणे आवश्यक आहे.

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २७ (३) नुसार सभासद झाल्यापासुन तीन वर्षाच्या कालावधीनंतर संस्था मतदानास पात्र होत असल्याने संस्थेच्या दिनांक ०१/०१/२०२२ यापुर्वी सभासद झालेल्या आहेत अशा संस्था त्यांच्या प्रतिनिधीचे ठराव पाठविण्यास व पर्यायाने मतदान करण्यास पात्र असतील.
२. सदर संस्था ही उपरोक्त संघाची व इतर कोणत्याही संस्थेची थकबाकीदार नसावी.
३. सभासद संस्थांचे प्रतिनिधीचे ठराव संस्थेचे मुख्यालय असलेल्या तालुक्यातील संबंधीत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुरबाड यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत दिनांक १७/०२/२०२५ ते १७/०३/२०२५ या कालावधीत सादर करावयाचे आहेत.
४. प्रतिनिधीच्या ठरावासोबत संस्थेने ही सभा बोलविण्यासाठी दिलेल्या नोटीसची प्रत, सभेच्या इतिवृत्ताची छायांकीत प्रत तसेच सभेच्या उपस्थिती पटाची प्रत ठरावासोबत सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्यासंबंधीचे मुळ रेकॉर्ड ठराव सादर करतेवेळी संबंधीत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुरबाड यांना तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावे.
५. प्रतिनिधी ठरावा संबंधीचा नमुना व प्रतिनिधीचा ठराव सचिव व व्यवस्थापक यांनी द्यावयाचा दाखला सोबत जोडलेला आहे. सदर नमुन्यातच संस्थेच्या लेटर हेडवर ठराव पाठवायचा आहे. नमुन्यात नसलेले ठराव स्विकारण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी, ठरावाचा नमुना व सचिव/ व्यवस्थापक यांनी द्यावयाचा दाखला सर्व सभासद सहकारी संस्थांनी संबंधित सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुरबाड यांचे कार्यालयाशी संपर्क साधुन प्राप्त करुन घेण्यात यावे.
६. प्रतिनिधीचे ठराव कोणत्याही परिस्थितीत दिनांक १७/०३/२०२५ पर